REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख २७ सप्टेंबर, १९४४ अंक ३९

## —राष्ट्रीय काटकसर—

युद्धकार्याची गरज लक्षांत घेऊन डबे वा कागद यांची बचत करणें भाग आहे. ही पॅकिंग-बाबतची अडचण लक्षांत घेऊन—

## —गोल्डन कोको—

सुटा मिळण्याची सोय सर्व प्रमुख व्यापाऱ्यांकडे करण्यांत येत आहे. सुटा कोको घेण्यानें पैशाचीही बचत होते. मात्र आपणांस गोल्डन कोकोच मिळत आहे अशी खात्री करून घ्या. नांव लक्षांत ठेवा.

साठे बंधू, " गोल्डन कोको "

—सर्वत्र मिळतो—

साठे कोको व चॉकोलेट कारखाना, पुणें १.

## देना बँक

देवकरण नानजी बँकिंग कं. लिमिटेड.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. १,००,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | ... | रु. ५०,००,००० |
| वसूल भांडवल | ... | रु. ३५,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ... | रु. ११,००,००० |
| ३१-८-४४ रोजीं एकंदर ठेवी | ... | रु. ६,६७,६९,९०५ |
| ,, खेळतें भांडवल | ... | रु. ७,३१,६१,८३१ |
| ,, खात्यांची संख्या | ... | १८,१५६ |
| ,, शाखांची संख्या | ... | १८ |

देना बँक लवकरच बऱ्हाणपूर येथें एक शाखा उघडणार आहे.

## भूगर्भांतील पाण्यासंबंधीं तज्ज्ञ—सल्ला

विहीर अगर बोअर करण्याचे आधीं त्या ठिकाणीं पाण्याचा झरा लागेल अगर नाहीं हें अजमावणें काळ्या दगडाचे भागांत अत्यंत आवश्यक आहे. जागा पाहून अशा प्रकारचा खात्रीलायक सल्ला देण्यांत येईल.

७५४ शुक्रवार पुणें नं. २ } न. ग. आपटे, बी. एजी. जलशास्त्रपारंगत




व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. मुंबई.
मसाल्याचे व्यापारी
पुणें एजंट:—
द. ना. हेजीब

गिरगांव मुंबई नं. ४

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

## ' पूना प्रॉपर्टीज् '

पुणें येथें बंगले, प्लॉट्स्, जमिनी वगैरे मिळकतींच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार दसऱ्याच्या सुमुहूर्तावर सुरू होणार.

| | |
|---|---|
| " दया-निवास " कॉमनवेल्थ कॉलनी, पुणें २. | म. य. दातार, प्रोप्रायटर, " पूना प्रॉपर्टीज् " |


## विविध माहिती

### श्री. दत्तोपंत फाटक ह्यांचा नवा उपक्रम

पुणें येथील पायोनियर डाइंग हॉऊसची माहिती सर्वांना आहेच. त्यांनी आतांपर्यंत कपडा रंगवून देणेबद्दल लोकांची खात्री करून दिलेली आहेच. आतां त्यांनीं स्टीम लॉंड्री सुरू केली असून, ती यशस्वी झाली आहे. स्टीम लॉंड्रीनें कपडे फाटतात अशी लोकांची समजूत झालेली आहे, ती समजूत पायोनियर डाइंग हाऊसचे मालक श्री. फाटक यांनीं चुकीची ठरविली आहे. हा प्रयोग बऱ्याच लोकांनीं केला होता; परंतु त्यांत म्हणावें तसें त्यांना यश न आल्यानें श्री.फाटक ह्यांच्या उपक्रमाचें महत्त्व विशेष आहे. त्यांच्या लॉंड्रींत सुताचे, रेशमी व लोकरीचे कपडे निरनिराळे धुवून निघतात. त्यांनीं प्रयोगाकरितां एकच मशिन आणलें असून तें सध्यां चालू आहे. लोकांकडून धुण्यासाठीं कपडे येत असून त्यांची खात्री होऊं लागली आहे.

### देना बँकेच्या नव्या भागांचें स्वागत

देवकरण नानजी बँकिंग कं. लि. चें अधिकृत भांडवल ५० लक्ष रुपये होतें व विक्रीस काढलेल्या, खपलेल्या आणि वसूल भांडवलाचा आकडा १० लक्ष रुपये होता. कंपनीनें उरलेलें ३० लक्ष रुपयांचें भांडवल नुकतेंच विक्रीस काढलें. प्रत्येक ५० रुपयांच्या ऑर्डिनरी भागास १५ रुपये वाढावा घेण्यांत आला. विक्रीस उपलब्ध असलेल्या भागांपेक्षां अधिक भागांस मागणी आलेली आहे, असें समजतें. बँकेचें अधिकृत भांडवल १ कोटि रुपये करण्यांत आलेलें आहे.

### मुंबई प्रांतिक सहकारी लँड मॉर्गेज बँक लि.

जमीन व धान्य ह्यांच्या किंमती वाढत्या असल्याकारणानें, दीर्घ मुदतीच्या जुन्या कर्जफेडीसाठीं लागणाऱ्या कर्जास आतां मागणी कमी आहे व मुदतीचे आधींच कर्जफेड होऊं लागली आहे. १९४३-४४ मध्यें प्रांतिक बँकेनें २ लक्ष, २७ हजार रुपये कर्जाऊ दिले. प्राथमिक बँकांनीं पुढील हप्त्यांचे पोटीं ४ लक्ष, ६ हजार रुपये आगाऊच परत केले. एका वर्षांत, मध्यवर्ती बँकेचें प्राथमिक बँकांकडून येणें २३ लाखांनीं कमी झालें. ह्या सर्वांचा बँकेच्या नफ्यावर परिणाम होऊन, नफ्याचा आंकडा १५,१२१ रुपयांवर आला व डिव्हिडंडचा दर चार वर्षे २३% होता तो २$\frac{1}{8}$% वर आणावा लागला. भाग भांडवल वाढत गेलें आहे व व्यवहाराचा आकडा उतरत चालला आहे.

### डिफेन्स से. सर्टिफिकेटांचे अधिकृत विक्रेते

सरकारी डिफेन्स सेव्हिंग्ज सर्टिफिकेटांचे पुणें शहरांतील अधिकृत विक्रेते म्हणून श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम्. शेअर व स्टॉक ब्रोकर ह्यांची नेमणूक झाली आहे.

### केंप आणि कं. लि.

वरील कंपनीस ३१ मार्च, १९४४ असेर संपलेल्या वर्षी १,५०,६६३ रुपये फायदा झाला. भागीदारांस १५% डिव्हिडंड मिळणार आहे.

## शेअर बाजार

( श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम्, २४ डे. जि. पुणें ४ )

लढाई संपणार या भावनेनें सर्व बाजार फारच खालीं आलेले आहेत, आणि जरी आजच्या भावावर कमी येणारीं व्याजेंसुद्धां समाधानकारक म्हटलीं पाहिजेत अशी परिस्थिती आहे, तरीसुद्धां गुंतविणारे अजून बेतानेंच पाऊल टाकीत आहेत. लढाई आज-उद्यांत संपत नाहीं हें वाढणाऱ्या जर्मन प्रतिकारावरून दिसत आहे. युरोपमधील युद्ध संपलें तरी जपानशीं चालू असलेलें युद्ध निश्चितपणें बरेच दिवस चालणार आहे असें दिसतें. तें चालू आहे तोंपर्यंत हिंदुस्थानांत दोस्तांचा युद्धखर्च वाढतच रहाणार. त्यामुळें सर्व बाजारांच्या पाठीमागें विस्तार पावणाऱ्या चलनाचा एकसारखा पाठिंबा रहाणार आहे. जपानी कापड अथवा सूत यांची स्पर्धा हिंदी धंद्याशीं यापुढें कदापि होणें शक्य नाहीं असें मानण्यास आज हरकत नाहीं. कापडाचा धंदा हा आतां भक्कम पायावर उभा राहिलेला असून असून तो हिंदुस्थानांतील सर्वांत मोठा, सुव्यवस्थित व सर्वांत जास्त पैसा कमावणारा आहे. युद्धमूलक सरकारी मागणी जरी कमी झाली तरी युद्धोत्तर हिंदी जनतेची मागणी जोरांत येणार असून, हिंदी कापडाचा निर्गत व्यापार हाही फोफावणार आहे. सरतेशेवटीं तूर्त जास्त व्याज देणारीं गुंतवणुकीस साधनें नसल्यानें पैसेवाल्या मंडळीस शेअरबाजाराकडेच धांव घेणें भाग आहे. सोन्याचांदीचे बाजारांतून मोकळा होणारा पैसा हा सुद्धां शेअर बाजाराकडेच वळला पाहिजे. तेव्हां चालू असलेली मंदी ही बरीचशी कृत्रिम असून ती फार दिवस टिकणार नाहीं असें अनुमान काढण्यास कुठलाही धोका नाहीं. आकारानें लहान असे इंडिया युनायटेड डिफर्ड व ऑर्डिनरी, आपोलो, न्यु व्हिक्टोरिआ प्रेफरन्स आणि बी. आय. सी. हे व संख्येनें कमी असलेले सिम्प्लेक्स, पोद्दार, मोरारजी, माधवजी, श्रीनिवास, न्युसिटी यांच्यामध्यें लोक आणखी मंदीची वाट पहात आहेत, तों नकळत तेजी होऊन जाईल असा इशारा द्यावासा वाटतो.

### पुणें से. को. बँक, लि.

वरील बँकेची वार्षिक सभा ता. २४ सप्टेंबर रोजीं भरली होती. वार्षिक निवडणुकींत खालील उमेदवार व्यक्तिशः भागीदारांतर्फे निवडून आले:—

| डायरेक्टर्स | मतें |
|---|---|
| १ रा. सा. य. द. खोले | ६८२ |
| २ श्री. श्री. रा. पाळंदे | ६२७ |
| ३ श्री. य. धों. ओगले | ६२६ |
| ४ श्री. ग. र. तुळशीबागवाले | ६१३ |
| ५ श्री. दा. ग. बापट | ५६८ |
| ६ श्री. वा. के. जोशी | ५४४ |
| ७ श्री. वि. ज. करंदीकर | ५४३ |
| **ऑडिटर्स** | |
| १ श्री. गो. द. आपटे | ६७३ |
| २ श्री. एम्. जी. ओक | ४३४ |

श्री. पाटसकर हे अर्बन सोसायट्यांतर्फे डायरेक्टर निवडून आले. रा. सा. खोले ह्यांची नव्या वर्षाकरितां चेअरमन म्हणून पुनः निवड झाली आणि रा. सा. मगर हे व्हाइस-चेअरमन झाले.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ३०६ | उपयुक्त कामगिरी—वटा-ट्यांच्या साठ्यांची योजना—कोयनेलचें डांबरापासून उत्पादन. | |
| २ शेअर बाजार ... | ३०६ | ८ पौंडांतील कर्जाची उतरती कमान ... ... | ३१० |
| ३ पुणें डॅ. को. बँक ... | ३०६ | ९ युद्धखर्चांची तुलना ... | ३१० |
| ४ ब्रिटिश सहकारी संघटनेची शतसंवत्सरी... ... | ३०७ | १० मुधोळ स्टेट सॅ. को. बँक | ३११ |
| ५ हिंदी शेतीची चर्चा | ३०८ | ११ कराड अर्बन को. बँक | ३११ |
| ६ डिफ्रीनंतर शेतकरी | ३०८ | १२ मुंबई प्रां. सहकारी बँक | ३११ |
| ७ स्फुट विचार ... | ३०९ | १३ विहिरींचा पाणीपुरवठा | ३११ |
| ड. डे. बोर्डाची सभा—श्री. सरय्या ह्यांचें भाषण—बँकेची | | | |



# अर्थ

बुधवार, ता. २७ सप्टेंबर, १९४४


## ब्रिटिश सहकारी संघटनेची शतसंवत्सरी

### " रॉकडेल पायोनिअर्स "

ग्रेट ब्रिटनमध्यें सहकारी पद्धतीच्या माल-विक्रीच्या संघटनास चालू वर्षी शंभर वर्षें पुरीं झालीं असल्यानें तो प्रसंग साजरा केला जात आहे आणि हिंदुस्थानांतहि ब्रिटिश सहकारी कार्या-विषयींचा आदर व्यक्त करण्यासाठी सभा भरावयाच्या आहेत. ग्रेट ब्रिटनमधील सहकार मुख्यत्वें करून लोकांच्या नित्याच्या गरजा भागवण्यासाठी चांगला माल तयार करून व जमवून तो योग्य भावानें विकण्याच्या व्यवहारास वाहिलेला आहे आणि त्या हेतूनें देशभर लहान-मोठीं दुकानें चालवण्यांत येत आहेत. ह्या संस्थांच्या सभासदांमध्यें कामकरी लोकांचा भरणा आहे. ह्या कार्याचा व्याप आणि त्याची व्यवस्था ह्यांची माहिती हिंदुस्था-नांतील सहकारी कार्यकर्त्यांस असणें अगत्याचें आहे. आर्थिक दृष्ट्या निर्बल असलेल्या ब्रिटिश जनतेनें सहकारी तत्त्वाचा आश्रय करून संघशक्तीच्या सामर्थ्यानें अत्यंत अल्प प्रमाणांतील आपल्या भांडवलाच्या पायावर सध्याचा टोलेजंग धंदा उभारला आहे. ह्या तेजस्वी इतिहासापासून हिंदुस्थानांतील लोकांस स्फूर्ति मिळण्या-सारखी आहे. १८४४ सालापूर्वी ग्रेट ब्रिटनमध्यें रॉबर्ट ओवेन ह्यांच्या नेतृत्वाखाली कांहीं सहकारी मंडळ्या स्थापन झाल्या होत्या, तरी ब्रिटिश सहकारी चळवळीचा खरा पाया त्या वर्षी रॉकडेल येथें २८ कामगारांनीं प्रत्येकीं एक पौंड वर्गणी देऊन एक दुकान घातलें हाच समजला जातो, हें योग्य आहे आणि त्याच उपक्र-माची शतसंवत्सरी यंदा साजरी केली जात आहे. ह्या उत्पाद-कांचा मुख्य उद्देश बचत करून परस्पर सहायानें स्वतःच्या नित्याच्या गरजा भागवणें हा होता, तरी त्यांच्या कार्यक्रमांत घरें बांधणें, शेतीच्या व इतर मालाचें उत्पादन करणें आदि क्रमाक्रमानें सबंध आर्थिक क्षेत्र व्यापून शिक्षण व राजकारण ह्यांतहि आपल्या तत्त्वांचा शिरकाव करणें ह्या बाबींचा अंतर्भाव प्रारंभींच केलेला होता. त्यांचीं तत्त्वें आणि व्यवहाराचे नियम आतां सर्वमान्य झाले आहेत.

रॉकडेल पायोनिअर्सच्या स्टोअरची प्रगति मंद गतीनें झाली आणि तिसऱ्या वर्षाचे अखेरीस ह्या सोसायटींत केवळ ११० सभासद होते. पण गेल्या शंभर वर्षांत तिनें रोवलेल्या रोपट्याचा प्रचंड वृक्ष बनला असून त्याच्या शाखा जगभर पसरल्या आहेत आणि त्यापासून सर्वत्र राष्ट्रीय वृक्ष निर्माण झाले आहेत. ग्रेट ब्रिटनमध्यें किरकोळ माल विकीच्या १,१४८ सोसायट्यांचे ९० लक्ष सभासद आहेत आणि १९४२ सालीं त्यांनीं सुमारें ४२५ कोटि रुपये किंमतीच्या मालाची विक्री केली. त्यांच्या नोकर लोकांची संख्या तीन लक्ष आहे. इंग्लंडमध्यें मध्यवर्ती संस्था " कोऑपरे-टिव्ह होलसेल सोसायटी " ही आहे आणि स्कॉटलंडमध्यें ह्याच नमुन्याची दुसरी संस्था आहे. त्यांच्या भांडवलाच्या व विक्रीच्या किंमतीचा आकडा अडीचशें कोटि रुपयांच्या घरांत आहे. ह्या दोन सोसायट्या नुसती विक्रीच करीत नाहींत तर उत्पादन, वाहा-तूक, बँकिंग व विमा इत्यादि व्यवसायहि त्यांच्या क्षेत्रांत येतात. त्या दोन्ही मिळून एकत्र चहा, कॉफी व कोको ह्यांच्या उत्पाद-नाचा व पुरवठ्याचा धंदा करतात. किरकोळ विक्री करणाऱ्या सोसायट्या दूध, ब्रेड वगैरेच्या पुरवठ्याचा विशिष्ट व्यवसाय संयुक्त संघटनेनें करतात. ब्रिटिश सहकारी संस्थांचें एक संघटित स्वतंत्र राज्यच जणूं काय बनलें आहे. त्यांचें एकीकरण को-ऑप-रेटिव्ह यूनिअन ह्या मध्यवर्ती संस्थेंत झालेलें आहे आणि हें एक प्रकारचें कार्यकारी मंडळ असून त्याचें काम सर्व प्रकारची माहिती गोळा करून पुरवणें, सल्ला देणें व शिक्षणाची व्यवस्था करणें हें आहे. सर्व संस्थांच्या प्रतिनिधींची वार्षिक परिषद भरते आणि तीमध्यें निश्चित झालेल्या धोरणाची अंमलबजावणी नॅशनल को-ऑपरेटिव्ह ॲथॉरिटी ह्या संस्थेकडे सोंपवलेली आहे.

वरील त्रोटक वर्णनावरून ब्रिटिश सहकारी चळवळ किती संघटित, विस्तृत, बलवान व कार्यक्षम आहे ह्याची कल्पना येईल. युद्धपरिस्थितींत ब्रिटिश सहकारी संस्थांचें उत्पादन निर-निराळ्या अपरिहार्य सरकारी नियंत्रणामुळें मर्यादित झालें असलें तरी मालाच्या वाटणीचे बाबतींत त्यांच्या कार्याचा विस्तारच झालेला आहे. इंग्लंडमध्यें रेशनिंग व्यवस्थित पद्धतीनें चालू आहे आणि ब्रिटिश लोकसंख्येच्या एकचतुर्थांश लोक शिधापद्धतीच्या क्षेत्रांतील माल सहकारी स्टोअर्समधून विकत घेत आहेत. सह-कारी दुकानें अगोदरच चांगल्या रीतीनें चालत असल्यानें त्यांस हा युद्धकालीन व्यवहार सहज हातीं घेतां आला आहे. ब्रिटिश सहकारी संस्थांनीं युद्धोत्तर काळांतील आपल्या प्रगतीचा प्रश्न अर्थातच हातीं घेतला आहे आणि त्याचा विचार करण्यासाठी नेमलेल्या समितीनें कित्येक सूचनाहि केल्या आहेत. ह्या समि-तीच्या सभासदांमध्यें महत्त्वाचे मतभेद आहेत. तथापि, प्रगति व अधिक बळकटी ह्यांच्या आवश्यकतेबाबत त्यांचें पूर्ण ऐकमत्य आहे. ब्रिटिश सहकाऱ्यांची वार्षिक परिषद यंदा वेळेस भरूं शकली नाहीं व ती पुढें ढकलावी लागली. ह्यामुळें युद्धोत्तर संवर्धनाविषयींचे निर्णय अजून करतां आलेले नाहींत. " रॉकडेल पायोनिअर्स " च्या उपक्रमाचे शतसंवत्सरीचे निमित्तानें हिंदी सहकारी कार्यकर्त्यांनीं ब्रिटिश सहकारी चळवळीचीं ध्येयें, तिची लोकशाहीची घटना, तिचें उत्साही कर्तृत्व, इत्यादि संबंधांत योग्य तो बोध घेणें उचित नाहीं काय ?

## लंडन रेडिओवर हिंदी शेतीची चर्चा

बी. बी. सी. ( ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशन ) च्या लंडन रेडिओवर हिंदुस्थानच्या आर्थिक प्रगतीविषयींच्या प्रश्नांची चर्चा तज्ज्ञांकडून करवण्याचा उपक्रम कांहीं महिन्यांमागें करण्यांत आला होता. ती चर्चा नुकतीच पुन्हां चालू झाली आहे आणि गेल्या आठवड्यांत प्रसिद्ध लेखक मि. जे. बी. प्रीस्टले ह्यांचे अध्यक्षतेखालीं हिंदुस्थानांतील अन्न-पुरवठ्याच्या प्रश्नाचा विचार तीमध्यें झाला. सर जॉन रसेल आणि सर माल्कम डार्लिंग अशा माहितगारांनीं ह्या विचारविनिमयांत भाग घेतल्यानें तो बोधप्रद झाला आणि तो हिंदी नभोवाणीवरून प्रसृत करण्यांत आला ही सोय झाली आहे. युद्धोत्तर काळांत जगांतील सर्व देशांत लोकांच्या रहाणीचा दर्जा वाढवण्याचे प्रयत्न जागतिक भूमिकेवर व्हावयाचे आहेत आणि त्यांमध्यें धान्य वगैरे आहारविषयक जिनसांचा पुरवठा वृद्धिंगत करण्याच्या धोरणास विशेष महत्त्व दिलें जाणार आहे. ह्या दृष्टीनें हिंदुस्थानची स्थिति काय आहे, आणि ती सुधारण्यासाठी काय केलें पाहिजे असा मुद्दा वरील चर्चेत प्रथम उपस्थित करण्यांत आला. ह्यासंबंधांत अशी माहिती देण्यांत आली कीं अलीकडे लोकसंख्येच्या वाढीच्या प्रमाणांत हिंदुस्थानांत जमिनीची लागवड कमी झालेली दिसत नाहीं. हिंदी शेतीच्या उत्पादकतेच्या दृष्टीनें पहातां जमीनदारीची पद्धति चांगली कीं स्वतंत्र शेतकऱ्यांची पद्धति चांगली हा प्रश्न उपस्थित झाला असतां असें सांगण्यांत आलें कीं जमीनदारापाशीं पैसा असल्यानें त्यास शेतीच्या धंद्यांत भांडवल घालतां येतें तसें करणें लहान शेतकऱ्यांस परवडत नाहीं. पण जेथें जमीनदार स्वतःची जबाबदारी न ओळखतां कुळांकडून येणाऱ्या खंडावर संतुष्ट असतात आणि जमिनीची व पिकांची सुधारणा करीत नाहींत तेथें शेत करणारांच्या मालकीची पद्धति चांगली असा निर्णय देण्यांत आला. बल्गेरियांत व डेन्मार्कमध्यें करण्यांत आलेल्या शेती सुधारणांचा येथें दाखला देण्यांत आला. परंतु शेतीचा धंदा यशस्वी होण्यास गहूं, जोंधळा वगैरे सारखीं नुसतीं धान्यांचीं पिकें करून भागत नाहीं आणि जनावरांची पैदास व दूधदुभतें ह्यांच्या व्यवहाराची म्हणजे संमिश्र शेतीची आवश्यकता असते असें प्रतिपादण्यांत आलें.

रशियांत मोठ्या प्रमाणावर यंत्रसहाय्यानें संयुक्त पद्धतीची ( कलेक्टिव्हायझेशन ) शेती केली जात आहे, त्याचें अनुकरण हिंदुस्थानांत होणें कितीसें व्यवहार्य आहे हा प्रश्न उपस्थित झाला असतां त्यास नकारात्मक उत्तर मिळालें. रशिया हा अफाट देश आहे आणि नांगराखालीं न आलेली अशी जमीन-तेथें मुबलक आहे. त्यामुळें शेतकऱ्यांच्या मोठमोठ्या वसाहती करून यांत्रिक पद्धतीनें पिकें काढणें तेथें शक्य आहे. पण हिंदुस्थानांत त्या पद्धतीस फारसा वाव नसून वैयक्तिक रीतीनें स्वतंत्रपणानें धंदा करण्याची शेतकऱ्यांची परंपरा पहातां रशियाचें अनुकरण ह्या दृशांत व्यवहार्य नाहीं असा अभिप्राय सर माल्कम ह्यांनीं दिला. रशियांतहि संयुक्त शेतीच्या मोठ्या प्रमाणावरील शेतीमुळें दर एकरी उत्पन्न वाढलें आहे असें दिसत नाहीं आणि काम नसलेले शेतकरी कारखान्यांत जाऊं शकतात असें सर जॉन रसेल म्हणाले. हिंदुस्थानांत कारखानदारीचा प्रसार होईल तर कित्येक खेडेगांवीं लोकांस शहरी धंद्यांत काम मिळूं शकेल आणि शेतीमधील गर्दी कमी होईल. पाण्याचा पुरवठा केला गेल्यास शेतीस लायक अशी जमीन आज पडून आहे ती लागवडींत आणतां येऊन धान्याची पैदास वाढूं शकेल असें मत व्यक्त करण्यांत आलें.

हिंदुस्थानांत जमिनीचे लहान तुकडे पडले असल्यामुळें शेती उत्पादक होऊं शकत नाहीं. ह्यावरचा उपाय म्हणून शेतांच्या तुकड्यांचें एकीकरण करण्याचा प्रश्न चर्चेस निघाला तेव्हां सर माल्कम डार्लिंग ह्यांनीं पंजाब व मध्यप्रांत ह्यांमध्यें ह्या उपायाची अंमलबजावणी मोठ्या प्रमाणांत झाली आहे हें सांगितलें. शेतांच्या एकीकरणाच्या योगानें शेतीचें उत्पादन तीस टक्क्यांनीं वाढल्याचा अनुभव सांगण्यांत आला. सहकारी पद्धतीनें जमिनीच्या तुकड्यांचें एकीकरण फार मोठ्या क्षेत्रांत पंजाब प्रांतांत घडवून आणलें गेलें आहे आणि त्या पद्धतीचा अवलंब इतरत्र केला गेल्यास अन्नपुरवठ्याच्या वाढीचा प्रश्न सुटण्यास पुष्कळ सहाय होईल असें मत व्यक्त करण्यांत आलें. हिंदुस्थानांतील विशिष्ट परिस्थिति, येथील शेतीची परंपरा, मोठी वाढती लोकसंख्या, इत्यादि गोष्टी लक्षांत घेतां शेतकऱ्यांस दुय्यम धंदे करतां येण्याची व्यवस्था झाल्यास त्यांची प्राप्ती वाढून रहाणीहि सुधारेल असा विचारहि चर्चेत पुढें आला आणि फ्रान्समध्यें रिकाम्या वेळांत शेतकऱ्यांच्या कुटुंबांत विजेनें चालणाऱ्या लहान यंत्रांच्या सहाय्यानें धंदे चालवले जात असल्याचा दाखला देण्यांत आला. परंतु अन्नपुरवठ्याच्या प्रश्नाशीं ह्या गोष्टीचा प्रत्यक्ष संबंध नसल्याकारणानें सदरहु विषयाची पुढें चर्चा झाली नाहीं.

---

## डिक्रीनंतर जजमेंट डेटर शेतकरी झाल्यास शेत कलेक्टरचे ताब्यांत देतां येतें काय ?

शामरावनें ता. १५।१०।३७ रोजीं पांडुरंगवर मनी-डिक्री मिळविली. त्यावेळीं पांडुरंग शेतकरी नव्हता. १९४० मध्यें डिक्रीच्या अंमलबजावणीसाठी शामरावनें अर्ज दिला. १९४० मध्यें पांडुरंग शेतकरी झाला होता. डे. अॅ. रि. अॅक्टच्या क. २२ (२) च्या दुसऱ्या पॅरेग्राफमध्यें असें म्हटलें आहे कीं, शेतकऱ्यावर डिक्री झाली असेल तर त्याचें शेत कलेक्टरच्या ताब्यांत देऊन त्या शेताच्या उत्पन्नांतून डिक्रीची फेड होऊं शकते. शामरावनें हीच मागणी मागितली होती. पांडुरंगचें म्हणणें असें होतें कीं, जो इसम डिक्रीचे वेळीं शेतकरी असेल त्याचेच बाबतींत वरील प्रकारें डिक्रीची फेड होऊं शकते. डिक्रीनंतर ज. डे. शेतकरी झाला असेल तर डिक्रीचे फेडीसाठी त्याचें शेत कलेक्टरचे स्वाधीन करतां येत नाहीं. खालच्या कोर्टांनीं पांडुरंग विरुद्ध निकाल दिल्यामुळें त्यानें हें मुंबई हायकोर्टांत अपील केलें होतें.

शेतकऱ्यावर डिक्री झाली असेल तर त्या डिक्रीचे फेडीसाठी त्याचें शेत अधिकांत अधिक ७ वर्षेपर्यंत कलेक्टरचे ताब्यांत देतां येतें व उत्पन्नांतून डिक्रीची फेड होऊं शकते, अशी तरतूद डे. अॅ. रि. अॅक्टच्या क. २२ (२) च्या दुसऱ्या पॅरेग्राफमध्यें करण्यांत आली आहे. ती तरतूद लागू पडण्यासाठी डिक्रीचे वेळीं ज. डे. शेतकरी असला पाहिजे. डिक्रीनंतर ज. डे. शेतकरी झाला असेल तर ती तरतूद लागू पडणार नाहीं. मुंबई हायकोर्टाचा वरील प्रकरणांतील निवाडा हें सांगतो. —न्यायबोध

---

# स्फुट विचार

## रूरल डेव्हेलपमेंट बोर्डाची सभा

प्रांतिक रूरल डेव्हलपमेंट बोर्डाची सहामाही सभा नुकतीच भरली होती, तीमध्यें युद्धोत्तर पुनर्घटनेची मुंबई सरकारची योजना आणि धान्याचें अधिक उत्पादन व त्याची वाटणी ह्या प्रश्नांचा प्रामुख्यानें अपेक्षेप्रमाणें विचार झाला. सभेचें उद्घाटन गव्हर्नर-साहेबांनीं केलें आणि तीमध्यें चर्चिल्या जाणाऱ्या महत्त्वाच्या विषयांचा उल्लेख केला. युद्धांतून परत येणाऱ्या सैनिकांच्याच फायद्यासाठीं आर्थिक पुनर्घटनेची योजना सरकारनें आखली आहे ह्या टीकेस उत्तर देतांना त्यांनीं सांगितलें कीं रणांगणावर पराक्रम गाजवून देशाचें स्वार्थत्यागपूर्वक रक्षण करणाऱ्या शिपायांची व्यवस्था करणें हें तर समाजाचें कर्तव्यच आहे; तथापि, सरकारी योजनांचा फायदा प्रांताच्या सर्व भागांस व लोकांस मिळावा अशी त्यांची रचना आहे. मुंबई प्रांतास हिंदुस्थान सरकारकडून धान्य पुरवठ्याचें सहाय होणार आहे, तथापि, ह्या प्रांताच्या लोकांनीं धान्याच्या उत्पादनाची आणि समान वाटणीची शिकस्त केली पाहिजे असें त्यांनीं बजावलें. धान्य पिकवण्याचे बाबतींत सक्तीचा कायदा प्रांतिक सरकारनें केला आहे त्यास बोर्डानें मान्यता दिली. आर्थिक अभिवृद्धीचें योजनात्मक धोरण प्रांतांत अंगिकारण्यांत आलें आहे, आणि तें यशस्वी होण्यास त्यास लागणाऱ्या पैशाची तरतूदहि योजनात्मक पद्धतीची असणें आवश्यक झालें, आहे ही कल्पना गव्हर्नरांनीं बोर्डापुढें मांडली. सध्या सरकार उत्पन्न-खर्चाची तोंडमिळवणी करीत असून वाढावा गंगाजळींत टाकीत आहे. परंतु आर्थिक योजनेचा चालू खर्च प्रांताच्या अंगावर पडेल, तो भागवण्याकरितां मामुली उत्पन्नांत त्या वाढत्या खर्चाच्या मानानें वाढ करावी लागेल असें त्यांनीं सुचवलें. विजापूर जिल्ह्यांत जमिनींस बांध व ताली घालण्याचें काम प्रचंड प्रमाणावर चाललें आहे. त्याच्या क्षेत्राची व उत्पादकतेची माहिती बोर्डास देण्यांत आली. धान्यांच्या पैदाशींत गेल्या दोन वर्षांत विस्तार झाला आहे. त्याचे ठोकळ आकडे बोर्डापुढें मांडण्यांत आले ते बोधप्रद आहेत. कपाशीच्या पिकाचें क्षेत्रफळ ४० लक्ष एकरांवरून २८ लक्ष एकरांवर आणि तंबाखूचें २ लक्ष, १० हजार एकरांवरून १ लक्ष, २० हजार एकरांवर आलें आहे आणि ह्या मोकळ्या झालेल्या जमिनींत धान्यांचीं पिकें काढण्यास सवड झाली आहे. धान्यांच्या पिकांचें क्षेत्रफळ १९७ लक्ष एकरांचें २१२ लक्ष एकर झालें आहे. ह्या कारणानें धान्यांची पैदास ३३ लक्षांची ३८ लक्ष टन झाली आहे.

---

## प्रां. सहकारी बँकेचे अध्यक्ष, श्री. सरय्या, ह्यांचें भाषण

मुंबई प्रांतिक सहकारी बँकेचे अध्यक्ष, श्री. आर. जी. सरय्या, ह्यांनीं बँकेच्या वार्षिक सभेचे प्रसंगीं केलेलें भाषण नेहमींप्रमाणेंच उद्बोधक व माहितीपूर्ण असें होतें. युद्धकाळ संपून शांततेचा काळ येतांना उपस्थित होणाऱ्या प्रश्नांचा त्यांनीं उल्लेख करून, चलनविषयक सरकारी धोरण हें लोकांच्या आर्थिक परिस्थितीस पोषक होईल अशा रीतीनें आखलें पाहिजे, असें त्यांनीं सांगितलें. मध्यवर्ती व प्रांतिक सरकारच्या योजना दीर्घकालीन असणार व त्या अमलांत येण्यास वेळ लागणार; परंतु, शेतकऱ्यांच्या अडचणी मात्र निकडीच्या रहाणार, हें त्यांनीं उदाहरणें देऊन स्पष्ट केलें. हिंदी शेतकऱ्यांच्या शेतीच्या उत्पादनाच्या किमान किंमतीची हमी सरकारनें घेणें आवश्यक आहे, असें त्यांनीं सुचविलें. त्याखेरीज मंदीच्या काळांत शेतकऱ्यांचा निभाव लागणार नाहीं, हें उघड आहे. १९४२–४३ च्या मानानें १९४३–४४ मध्यें किंमती कमी राहिल्या; कपाशीची किंमत तर फारच खालीं गेली आणि विशेषतः खानदेशांतील शेतकऱ्यांस त्याचा दुष्परिणाम भोगावा लागला. तुलनात्मक किंमतींचा तक्ता खालीं दिला आहे:—

| | ऑगस्ट १९३९ | जून १९४३ | जून १९४४ |
|---|---|---|---|
| | रु. | रु. | रु. |
| भुईमूग ( पल्ला ) | ९½ | ३५ | २८ |
| कपास ( गाठ ) | ७० | १६० | ८० |
| मूळ ( पल्ला ) | २२ | ४८ | ४५ |
| भात ( मण ) | २½ | ७ | ७ |

---

## बँकेची उपयुक्त कामगिरी

बँकेच्या ठेवींत व कर्जांत वाढ कशी झाली आणि किफायतशीर भावांमुळें बँकेच्या वसुलीवर व थकबाकीवर कसा परिणाम झाला हें सांगून श्री. सरय्या ह्यांनीं बँकेच्या व्यापक कामगिरीचाहि थोडासा तपशील दिला. सहकारी सोसायट्यांमार्फत धान्य वांटपाचें काम होणें सोईचें आहे, ही गोष्ट सरकारास पटली असून बँकेनें अशा ९६ संस्थांना सबंद वर्षांत मिळून ३४ लक्ष रुपये वेळोवेळ दिले. वर्षअखेर त्यांचेकडून येणें ४½ लक्ष रुपये होतें. पश्चिम खानदेश व नाशिक ह्या जिल्ह्यांत बँकेनें ६,५१० पोतीं जरिला कपाशीचें बीं शेतकऱ्यांस वाटण्याची व्यवस्था केली. भुइमुगाच्या पेंडीच्या खताच्या प्रसाराचें कामहि बँकेनें केलें. विशेषतः पुणें, नगर व खानदेश जिल्ह्यांत हें खत वाटण्यांत आलें. अशा तऱ्हेचें कार्य बँकेच्या मामुली व्यवहारांत येत नसलें, तर त्याची उपयुक्तता निर्विवाद आहे. बँकेच्या शाखांचा विस्तार ह्या कामीं बँकेस विशेष उपयुक्त आहे. बॉंबे ॲग्रिकल्चरल डेटर्स रिलीफ ॲक्टाचे परिणाम सहकारी बँकांवर काय होतील, हें आज सांगतां येण्याजोगें नसलें तरी, ह्या कायद्याच्या अंमलबजावणीमुळें सहकारी बँकांस येणारी तूट सरकारनें भरून देणें आवश्यक आहे; त्याचप्रमाणें, पिक-कर्जाची व्यवस्था पहाण्यासाठीं सहकारी संस्थांना सरकारी आर्थिक व इतर मदत लागेल हें श्री. सरय्या ह्यांनीं स्पष्ट केलें. व्यवहारांत चोखपणा राखूनहि सहकारी बँकेस शेतकऱ्यांसाठीं काय करतां येणें शक्य असतें, ह्याचें प्रत्यंतर श्री. सरय्या ह्यांचें भाषण व बँकेचा ताळेबंद आणि अहवाल ह्यांत सांपडतें.

---

## बटाटे टिकविण्यासाठी पद्धतशीर साठ्यांची योजना

बटाट्यांचा पद्धतशीर सांठा करण्याचें शास्त्र पुणें जिल्ह्यांतील खेड तालुका व शिरूर पेटा ह्यांतील शेतकऱ्यांना चांगलें अवगत झालेलें आहे. चांगला बटाटा अर्थात जास्त काळ टिकूं शकतो, ह्या दृष्टीनें बटाट्यांच्या पिकाकडे काळजीपूर्वक लक्ष द्यावें लागतें. शेताजवळील झाडांखालील थंड जागा निवडून त्यांत ४ ते ५ फूट रुंद व जरूर तेवढे लांब वाफे करण्यांत येतात. प्रत्येक वाफ्याभोंवतीं ६ ते ८ इंच खोल व १ ते १½ फूट रुंद पाट काढण्यांत येतो व ह्यांतील मातीनें वाफ्याभोंवती बांध घालण्यांत येतो. वाफा पाण्यानें भरून आणि दोन तीन दिवस वाळवून झाल्यावर त्यांत

शेतांतून काढलेले बटाटे भरण्यांत येतात. साधारण ४ फूट उंच रास होते, तीवर टिंबाचा पाला घालतात. राशीवर ओलें गवत घालतात त्यामुळें बटाट्यांत कीड प्रवेश करूं शकत नाहीं व बटाटे थंड रहातात. कधीं कधीं राशीवर थोडीशी साखर टाकतात, ती खाण्यासाठीं येणाऱ्या मुंग्या बटाट्यांस उपद्रव देऊं पहाणारी कीड खाऊन बटाट्यांचें संरक्षण करतात. बाफ्यांभोंवताळच्या पाटांत पाणी घालून व गवतावर मधून मधून पाणी शिंपडून राशीमधील उष्णतामान कमी राखण्यांत येतें. हें सर्व नीट साधलें तर आंतील उष्णतामान, बाहेरील उष्णतामान १०५° असलें तरी,८५° वर जात नाहीं. पाटांतील पाणी बाफ्यांत येऊं न देण्याची खबरदारी मात्र घ्यावी लागते. विक्रीला नेण्याचे वेळीं बटाटे बाहेर काढण्यांत येतात. लष्करी खात्यासाठी बटाटे सांठविण्याकरितां वरील पद्धतीचा मोठ्या प्रमाणावर उपयोग करण्यांत आला. पुणें येथील शेतकी कॉलेज व खडकी येथील फळांच्या प्रयोगाचें केंद्र येथील दुतर्फा झाडांच्या रांगेखालील छायेंत गेले दोन मोसम हा उपक्रम करण्यांत आला व तो यशस्वी झाला, असें प्रसिद्ध झालें आहे. १९४३ सालीं २५ फूट लांब व ६ फूट रुंद असे एकूण २०० बाफे तयार करून त्यांत २५ हजार पोतीं म्हणजे ५० हजार मण बटाटे रचण्यांत आले. एकूण लष्करासाठी खरेदी केलेल्या बटाट्यांपैकी फक्त ५·५% बटाटे नासले असें आढळलें. बटाट्यांना पेट्रोलची धुरी देऊन किडीचा नाश करण्यासाठी रोज १ हजार पोतीं बटाटे स्वच्छ करतां येतील, अशीं चार कॉंक्रीटच्या हौदांची व्यवस्था शेतकी कॉलेजांत करण्यांत आली आहे. १ पोतें बटाटे स्वच्छ करण्याचा खर्च ४ आणे येतो.

---

## कोयनेलचें डांबरापासून उत्पादन

जगांत दरसाल ८० कोटि लोकांना मलेरियाचा उपद्रव होतो, परंतु ईस्ट इंडीजमध्यें तयार होणारें कोयनेल मामुली काळांतहि ५ कोटि लोकांना सुद्धां पुरें पडत नाहीं. आतां जपानचे ताब्यांत तीं बेटें गेल्यामुळें इतर देशांचे वाट्यास कोयनेल येण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाहीं आणि प्रत्यक्ष ईस्ट इंडीजमध्येंहि आणखी दहा–बारा वर्षें कोयनेल निघूं शकणार नाहीं. सिंकोना झाडापासून आतापर्यंत कोयनेल काढण्यांत येत असे. त्याचप्रमाणें, ॲटब्रिन व प्लॅस्मोचिन हे कृत्रिम पदार्थ कोयनेल इतके गुणकारक ठरलेले नाहींत. रॉबर्ट बर्नस वुडवर्ड आणि विल्यम डोअरिंग ह्या हारवर्ड विश्वविद्यालयांतील दोघां शास्त्रज्ञांनीं कृत्रिम कोयनेलाचें संशोधन पुरें करून त्याचें मोठ्या प्रमाणावर उत्पादन होण्याची शक्यता निर्माण केली आहे. कोयनेल हा पदार्थ कार्बन, हैड्रोजन, ऑक्सिजन व नैट्रोजन ह्यांच्या रेणूंचा बनलेला असतो. ह्या चार मूळ द्रव्यांच्या त्याच प्रमाणांतील ठराविक रेणूंचे हजारों पदार्थ बनतात, परंतु ते रेणू एकमेकांशीं कोणत्या प्रकारें बद्ध झालेले असतात, त्यावर सर्व कांहीं अवलंबून असतें. रेणूंचे मॉलिक्यूल बनतात व त्यांच्याशीं इतर मॉलिक्यूल बद्ध होऊन मोठे मॉलिक्यूल तयार होतात. कोणत्या प्रमाणांत, कोणत्या प्रकारें हें घडून येतें व कशामुळें पदार्थांचे गुणधर्म बदलतात, ह्या सर्वांचा अभ्यास करून योग्य त्या प्रकारची रचना घडवून आणणें, हें शास्त्रज्ञांचें काम आहे. वुडवर्ड–डोअरिंग ह्या जोडीनें, कोळशाच्या डांबरापासून कोयनेलच्या मूळ द्रव्यांच्या रचनेप्रमाणें रचना असणारे पदार्थ म्हणजेच कृत्रिम कोयनेल तयार केलें आहे. कोयनेलचे अनेक भाऊबंदहि आतां तयार होऊं शकतील व कदाचित् त्यांपैकी एखादा कोयनेलपेक्षांहि अधिक प्रभावी मलेरियाचा शत्रू असूं शकेल!

## पौंडांतील कर्जाची उतरती रक्कम

हिंदुस्थान सरकारचें रुपयांतील कर्ज वाढत चाललें असून ग्रेट ब्रिटनमध्यें उभारलेलें पौंडांतील कर्ज कमी होत चाललें आहे, इतकेंच नव्हे तर हिंदुस्थानचें येणें त्या देशांत साठत चाललें आहे. पौंडांतील व रुपयांतील कर्जाचे आकडे खालीं दिले आहेतः—

| मार्च अखेर | रुपयांतील कर्ज (कोटि रु.) | पौंडांतील कर्ज (कोटि रु.) |
|---|---|---|
| १९१४ | १८० | २६६ |
| १९१९ | ३५९ | ३०४ |
| १९२४ | ४८३ | ३९८ |
| १९२९ | ५५१ | ४७३ |
| १९३४ | ६९३ | ५१२ |
| १९३९ | ७०८ | ४६९ |
| १९४० | ७२८ | ४४२ |
| १९४१ | ८६१ | ३४५ |
| १९४२ | ९४१ | २१० |
| १९४३ (अंदाज) | १,२०८ | ५७ |
| १९४४ ( „ ) | १,३३५ | ३८ |

---

## चालू युद्धखर्चाची मागील महायुद्धांतील खर्चाशीं तुलना

गेल्या महायुद्धाचे मानानें चालू महायुद्ध किती खर्चाचें आहे, हें खालील तुलनात्मक आकडे स्पष्ट सांगतील. आंकडे कोटि पौंडांचे आहेत.

| | (अ) गेलें महायुद्ध १९१४–१८ | (ब) चालू महायुद्ध १९४३–४४ अखेरचा खर्च | (ब)चे(अ)शीं प्रमाण |
|---|---|---|---|
| अमेरिका | ७४३ | ४,८२८ | ६·५ |
| ग्रेट ब्रिटन | ९०० | १,८२३ | २·० |
| कॅनडा | ५२ | २८४ | ५·४ |
| ऑस्ट्रेलिया | ३३ | १३४ | ४·११ |
| दक्षिण आफ्रिका | ३ | ३३ | ११·५ |
| हिंदुस्थान | २१ | ५९ | २·८ |

वरील आकड्यांवरून, अमेरिकेचा चालू युद्धांतील खर्च फारच मोठ्या प्रमाणावर आहे आणि ब्रिटिश साम्राज्यांतील वसाहती व हिंदुस्थान ह्यांच्या खर्चाचा वाटाहि वाढत्या प्रमाणांत आहे, हें दिसून येतें.

---

## खानापूर तालुका को-ऑ. सुपरवायझिंग युनियन, लि. ऑफिस, वांगी

वरील युनियनची वार्षिक साधारण सभा शुक्रवार ता. २९।९।४४ रोजीं दुपारीं ३ वाजतां वांगी येथें युनियनचे ऑफिसांत भरणार आहे. तरी सदर सभेस सोसायट्यांनीं पंच कमिटीपैकीं एका प्रतिनिधीस अधिकार देऊन पाठवावें. सभेंत वार्षिक साधारण सभेचीं मामुलीं कामें होऊन नियम दुरुस्तीचा विचार होईल. साधारण सभेंत ठराव मांडावयाचे असल्यास ते २७।९।४४ चे आंत ऑफिसकडे पाठवावे.

### मुधोळ स्टेट सें. को. बँक लि., मुधोळ.

( वार्षिक सभा : ३०-९-४४ )

वरील बँकेनें अल्पावधींत चांगली प्रगति केली आहे. ३० जून १९४४ अखेरच्या दुसऱ्या वर्षी बँकेच्या सभासदांत १०७ सभासदांची भर पडली असून त्यांची संख्या २६७ झाली आहे. त्यांपैकीं १३ सहकारी सोसायट्या आहेत. वसूल भांडवलहि २२,६७५ रुपयांचें ३७,७०० रुपये झालें आहे. ठेवींचा आंकडा १ लक्ष, १७ हजारांवरून ३ लाखांवर गेला आहे आणि एकूण खेळतें भांडवल १ लक्ष ४९ हजारांचें ३ लक्ष ४८ हजार रुपये झालें आहे. अहवालाचे वर्षी बँकेनें एकूण ४ लक्ष, २४ हजारांचीं कर्जें दिलीं. वर्षअखेर व्यक्तिशः सभासदांकडे १ लक्ष ६७½ हजार रुपये व सोसायट्यांकडे ३½ हजार रुपये कर्ज येणें आहे. एकूण खेळत्या भांडवलापैकीं १ लक्ष ३१ हजार रुपये रोख व इतर बँकांत असून २४ हजारांचे सरकारी रोखे आहेत. दिलेलीं कर्जें मुख्यतः सोनें-चांदी, माल, इत्यादींच्या तारणावरीलच आहेत. बँकेची महालिंगपूर शाखा चांगली चालली असून तेथील कॅश क्रेडिटचा व डिस्कौंटचा व्यवहार समाधानकारक आहे. वर्षअखेर बँकेस निवळ नफा १,९६२ रुपये झाला. भागीदारांस ३% डिव्हिडंडसाठीं १,००० रुपये लागतील व ४९० रुपये रिझर्व्ह फंडाकडे जातील. श्री. ए. व्ही. देसाई, बी. ए., एलएल. बी., हे बँकेचे चेअरमन असून श्री. आर. एन. तबि हे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. बँकेस मुधोळ दरबारचा चांगला पाठिंबा आहे.

---

### कराड अर्बन को. बँक लि.

वरील बँकेची शेअर भांडवल, रिझर्व्ह व इतर फंड, ठेवी, कर्जें, खेळतें भांडवल, इत्यादि सर्व बाबतींत प्रगति होत आहे. बँकेचा रौप्य महोत्सव ५-९-४३ रोजीं साजरा झाला, त्यावेळीं श्री. वि. ना. फणसळकर, वकील, ह्यांनीं लिहिलेल्या बँकेच्या रौप्यमहोत्सव ग्रन्थाचें प्रकाशन झालें. अहवालाचे वर्षी थकबाकीचें प्रमाण आणखी उतरून तें १·४% वर आलें. बँकेस नफा २१,३३२ रुपये झाला. भागीदारांस ७½% डिव्हिडंड मिळालें. कराड सहकारी खरेदी-विक्री सोसायटीचें काम बँकेच्या देखरेखीखालीं चालू आहे. अहवालाचे वर्षी सोसायटीमार्फत ६ लक्ष रुपयांचा माल विकला जाऊन सोसायटीस कमिशनचे ७,०६६ रुपये मिळाले. सोसायटीच्या नफ्यापैकीं ४१९ रुपये बँकेच्या वाट्यास कराराप्रमाणें आले. अर्बन बँकेच्या कार्यक्षेत्रांत असणाऱ्या इतर सहकारी संस्थांना सभासद करून घेण्याची परवानगी मिळावी, अशी बँकेनें सहकारी खात्यास विनंति केली आहे. बँकेचा यशस्वी कारभार लक्षांत घेऊन तिच्या कार्यविस्तारास सहाय करण्याचें धोरण खात्यानें स्वीकारावें. श्री. ल. म. देशपांडे हे बँकेचे चेअरमन असून श्री. म. वि. खंडकर हे मॅनेजर व मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.

---

### श्रीगणेश मोफत वाचनालय व ग्रंथालय पुणें

ह्या संस्थेच्या २५ व्या वार्षिक समारंभानिमित्त ता. २७ बुधवार सकाळीं १० वा. नगराध्यक्ष श्री. व्ही. बी. देशमुख यांचे हस्ते सरस्वतीपूजन, नंतर तीर्थप्रसाद व पानसुपारी, रात्रौ नकलांचा कार्यक्रम होणार आहे.

### मुंबई प्रां. सहकारी बँक लि:

#### नवीन भाग विक्रीस काढणार

वरील बँकेकडील ठेवींत एका वर्षांत सुमारें पाऊण कोटि रुपयांची भर पडली. ३०-६-४४ अखेर बँकेकडे नोकरवर्गाचा फंड धरून ४ कोटि, १६ लक्ष रुपयांच्या ठेवी आहेत. बँकेचें स्वतःचें भांडवल व कर्जाऊ रकमा ह्यांचें प्रमाण नियमाबाहेर गेलें आहे, परंतु ३१ मार्च १९४६ पर्यंत त्यास सरकारी संमति मिळाली आहे. बँकेचें भाग भांडवल १५ लाखांचें २५ लाख करण्यासाठी बाय लॉमध्यें आवश्यक ती सुधारणा भागीदारांपुढें मांडून ती मंजूर करण्यांत आलेली आहे. हे भाग डायरेक्टरांस वाटेल त्या योग्य वेळीं व अटींवर विक्रीस काढण्यांत येतील. बँकेच्या ५० रुपयांच्या भागांची बाजारांत किंमत ९१ रुपये आहे, तेव्हां कांहीं वाढाव्यानेंच हे भाग विक्रीस निघतील, हे उघड आहे. बँकेचें शेतकी पतपेढ्यांकडील येणें कमी झालें असलें, तरी तिला इतर ठिकाणीं किफायतशीरपणें पैसा गुंतवितां आला. बँकेनें आपले कर्जाच्या व्याजाचे दर १% नें उतरविले. वर्षअखेर तिला २ लक्ष ३५ हजार रुपये नफा झाला. भागीदारांना ४% डिव्हिडंड व १% बोनस मिळणार आहे.

---

### विहिरींचा पाणीपुरवठा वाढविण्यासाठी बोअरिंगची सरकारी योजना

मुंबई सरकारचे ॲग्रिकल्चरल इंजिनिअर यांचे देखरेखीखाली आज अस्तित्वांत असलेल्या विहिरींत "बोअर" पद्धतीनें पहारा मारून भोकें पाडून पाणीपुरवठा वाढविण्याची योजना तयार करण्यांत आली आहे. सध्यां हातानें चालविण्याच्या बोअरिंग माशिनच्या सहाय्यानेंच हीं भोकें पाडण्यांत येतील. नडियाद, पालघर, पंढरपूर व करजगी या चार केंद्रांत ही एक एक यंत्रसामुग्री ठेवण्यांत येणार आहे. या यंत्राचे सहाय्यानें तीन इंच परिघाचें शंभर फूट खोलीपर्यंत भोंक पाडतां येईल. अशा प्रकारें विहिरीचा पाणीपुरवठा वाढल्यास त्यामुळें अधिक धान्य पिकें काढण्यास मदतच होणार आहे.

ज्या कोणास या यंत्राचे सहाय्यानें विहिरींत भोकें पाडून पाणीपुरवठा वाढवावयाचा असेल त्यानें "ॲग्रिकल्चरल इंजिनिअर टु गव्हर्मेंट, बी. पी. पुणें" या पत्त्यावर अर्ज करावेत. सरकारी अधिकारी ज्या क्षेत्रांत बोअर घ्यावयाचें त्याची तपासणी करून नंतर खालील अटींवर बोअरिंगचें काम करतील:—बोअरच्या पहिल्या पन्नास फुटांस दर फुटी १ रुपया, पुढें शंभरांपर्यंत १। रुपया असा खर्च येईल. तसेंच केसिंग पाइपचे खर्चापैकीं शेंकडा ६६ टक्के खर्च सरकार सोसणार व बाकीचा खर्च मालकानें सोसावयाचा आहे. यंत्रसामुग्री केंद्रस्थानाहून विहिरीचे ठिकाणापर्यंत नेण्याचा खर्च मालकानें करावयाचा. यंत्र चालू असतां मजूर व इतर किरकोळ सामान मालकानें द्यावयाचें आहे.

जलसंशोधन यंत्राचा उपयोग करून मग बोअर घ्यावयाचें असेल तर तशी सोय करण्यांत आली आहे.

( शेतकी आणि शेतकरी )

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

JUST PUBLISHED
INDIAN RURAL PROBLEM
BY
Sir Manilal Nanavati and Prof. J. J. Anjaria.
(Issued by the Indian Society of Agricultural Economics, Bombay).
Price Rs. 8
(Postage extra).
*Sole Selling Agents:—*
THE CO-OPERATORS' BOOK DEPOT.
9, BAKEHOUSE LANE,
FORT, BOMBAY.

जिकडे तिकडे प्रशंसा
इमिटेशन दागिन्यांवर रासायनिक क्रिया करून खऱ्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळें दागिना केव्हांही खराब होत नाहीं, ही पूर्ण खात्री झाली. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार बांगड्या किं. आठ रु. गरजेस्तव दागिना परत करणें झाल्यास वर चढविलेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.
भट कं. सांगली, S. M. C.
भट कंपनी शाखा—बुधवार पेठ, पुणें २.

पूना
गेस्ट
हाऊस

टेलिफोन नं. ७७१
संस्थापक :
कै. नानासाहेब सरपोतदार

"मागोरा"चा अभिनव व आश्चर्यकारक शोध
ढेकणांच्या उदबत्त्या
(ABC)
BUG COILS (ABC)
प्रत्येक उदबत्ती रात्रभर जळते व तोंपर्यंत ढेकूण आपलें ठिकाण सोडून बाहेर येत नाहींत. विशिष्ट धुरामुळें हा चमत्कार होतो. बॉक्समध्यें १२ तांबड्या उदबत्त्या तांबड्या पॅकिंगमध्यें बॉक्स किं. रु. १।८, ट. ख. निराळा.
दि मागोरा केमिकल कं. लि.,
हिराबाग, पुणें २

महाराष्ट्रांत लेखी गॅरंटी देणारे
पहिले व फक्त १ च
*गोल्ड् मेडॅलिस्ट् व मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट्*
पेन्टर बेडेकर, ए. जी.,
बुधवार चौक, पुणें २ (सिटी)
बाहेरगांवचीं कामें रेल्वे, मोटार, अगर पोस्टानें पाठवूं.

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाऊस
बुधवार चौक, पुणें २.

गांवोगांवीं विक्रेते पाहिजेत.
A 9
क्विनीनचे ऐवजीं मलेरियाकरतां खात्रीचा अनुभविक उपाय म्हणून 'एनाईन' वापरतात.
अलपाईन प्रॉडक्टस् (इंडिया) पुणें २

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. धोंण्ड वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.